तपासी अंमलदार

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** लोणी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0038 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/01/2024 23:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 29/01/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 29/01/2024

**Time From (वेळेपासून):** 13:13 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 29/01/2024 **Time (वेळ):** 23:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 043

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/01/2024 23:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रवरानगर ,राहाता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जालिंदर रामभाउ खर्डे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोल्हार बुद्रुक,राहाता ,लोणी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोल्हार बुद्रुक,राहाता ,लोणी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक श्रीपती गायकवाड | | | 1. स्टेट बंकेजवळ,जीजामाता चैक, श्रीरामपुर ,लोणी,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. **Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.29/01/2024

मी जालिंदर रामभाउ खर्डे, वय.42 वर्ष, व्यवसाय.- खाजगी नोकरी मॅनेजर, मा. आ.श्री. राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतुक संस्था, लि. प्रवरानगर, ता. राहाता, जि.अहमदनगर, रा.कोल्हार बुद्रुक ता.राहता, जि. अहमदनगर मो.नं. 9423787397
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि .28/01/2024 रोजी सायंकाळी सव्वापाच वाजेचे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.29/01/2024 रोजी 10/30 वा चे सुमारास प्रवरानगर येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 10/30 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे हे षासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी जवळच असलेल्या आमच्या कार्यालयामधील चेअरमन यांचा कक्ष सापळा पथकास उपलब्ध करून दिला. त्यावेळी श्री. लोखंडे यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, ''मी वरील ठिकाणचा रहिवाशी आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा प्रवरानगर येथे भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोलपंप आहे. सदरचा पेट्रोलपंप मा.आ. राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतुक संस्था, प्रवरानगर यांचे मार्फतीने चालविला जात असुन मी तेथे सन 2011 पासुन मॅनेजर म्हणुन सर्व व्यवहार पाहतो.
वजनमापे निरीक्षक कार्यालय, श्रीरामपुर, जि.अहमदनगर यांचेकडुन सदर पेट्रोलपंपाची वार्षिक तपासणी केली जाते व तपासणी झाल्यानंतर स्टॅम्पिंग प्रमाणपत्र दिले जाते.
दि. 27/01/2024 रोजी मी पेट्रोलपंपावर असताना श्री. किषोर आतकरे, कर्मचारी वजनमापे निरीक्षक कार्यालय श्रीरामपुर यांनी त्यांचा मो.नं. 9403988608 वरून मला फोन करून श्री. गायकवाड साहेब, वजनमापे निरीक्षक, श्रीरामपुर हे पेट्रोलपंपाची वार्षिक तपासणी करण्याकरीता येणार असल्याचे सांगितले. श्री.गायकवाड, वजनमापे निरीक्षक यांनी मागील वर्षी पेट्रोलपंपाची वार्षिक तपासणी करून स्टॅम्पिंग प्रमाणपत्र देण्याकरीता माझेकडे 10,000 /-रुपये लाचेची मागणी केली होती व 10,000/-रुपये न दिल्यास पेट्रोलपंपातुन डिझेल विक्री करता येणार नाही, पेट्रोलपंप सिल केला जाईल असे सांगितले होते. त्यावेळी मी त्यांना 10,000/-रुपये दिले होते.
आज दि. 29/01/2024 रोजी श्री. गायकवाड साहेब हे सदरील पेट्रोलपंपाची वार्षिक तपासणी करण्याकरीता येणार आहेत. गतवर्षीप्रमाणे या वर्षी देखील ते माझ्याकडे लाचेची मागणी करू शकतात. तसेच प्रत्येक पेट्रोल पंपाकडुन ते तपासणीवेळी पैसे घेत असतात. आज रोजी त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कारवाई बाबत मी तक्रार सांगीतली व माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, त्यानंतर त्यावर मी, दोन्ही पंचांनी व श्री. लोखंडे यांनी स्वाक्षरी केली.
त्यानंतर मी लोकसेवक गायकवाड यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पोकाँ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकाँ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला.

पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांनी मला पंच नं 1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रवाना केले त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. मी व पंच नं. 1 असे आमच्या संस्थेमार्फत चालविला जात असलेला प्रवरानगर येथील भारत पेट्रोलीयम कंपनीचा पेट्रोल पंप येथे जावुन लोकसेवक गायकवाड यांची भेट घेतली. मी त्यांचेषी पेट्रोलपंप तपासणी बाबत व स्टॅम्पिंग प्रमाणपत्राबाबत चर्चा केली असता त्या चर्चे दरम्यान त्यांनी सदर काम करुन देण्यासाठी माझ्याकडे पंचासमक्ष 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाच मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केले. त्यावेळी मी त्यांना मी बॅंकेतुन येतो असे म्हणुन मी व पंच क्र.1 असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.

त्यावेळी पोउपअधी.श्री.लोखंडे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डीग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता गायकवाड यांनी आमच्या संस्थेमार्फत चालविला जात असलेला प्रवरानगर येथील भारत पेट्रोलीयम कंपनीच्या पेट्रोल पंपाची तपासणी करुन त्याबाबतचे स्टॅम्पिंग प्रमाणपत्र देण्यासाठी माझ्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/-रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर गायकवाड यांचे विरूध्द आमच्या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंपावर लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 10,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पो. उपअधी.श्री. लोखंडे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इशारा ठरवुन दिला. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे दुचाकी वाहनाने गायकवाड यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी आमच्या संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या प्रवरानगर येथील पेट्रोल पंपाकडे रवाना करण्यात आले. आंम्ही पेट्रोल पंपाजवळ पोहचल्यानंतर थोडया वेळातच आमचे पाठोपाठ पो.उपअधी.श्री. लोखंडे, पंच नं. 2 व सापळा पथक असे पायी चालत आले व कोणालाही शंका येणार नाही याप्रमाणे सापळा लावुन थांबुन राहीले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे पेट्रोलपंपच्या केबीन जवळ गायकवाड उभे होते त्या ठिकाणी गेलो, त्यावेळी गायकवाड हे केबीनच्या बाजुला उभ्या असलेल्या ट्रकांकडे गेले त्यावेळी मी व पंच क्र.1 असे त्यांचे जवळ गेलो, त्यावेळी त्यांना म्हणालो,सर्टिफिकेट कधी? त्यावर गायकवाड म्हणाले, संध्याकाळी चार-पाच वाजेपर्यंत टाकुन देतो, त्यावर मी म्हणालो, तुम्ही म्हणले त्याप्रमाणे दहा हजार आणले असे म्हणुन मी 10,000/-रुपये लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे डावे हाताने स्वीकारुन त्यांचे पॅंटच्या डाव्या खिशात ठेवली. त्यावेळी मी सापळा पथकास लाच स्वीकारल्याबाबतचा नियोजीत इशारा केला, त्यावेळी आजुबाजुला उभे असलेले सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक गायकवाड यांना लाच रकमेसह दुपारी 3/06 वाजता रंगेहाथ पकडले. त्यावेळी पो.उपअधीक्षक श्री लोखंडे यांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अशोक श्रीपती गायकवाड, वय-52 वर्ष, पद-निरीक्षक,वैध मापनशास्त्र विभाग श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर,जि.अहमदनगर, ह.मु.स्टेट बॅंकेजवळ,जीजीमाता चैक, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर.जि. अहमदनगर, रा.फ्लॅट नं. 02, स्वामिनी रेसिडेन्सी, सनसिटी रोड, पीएमएसी भाजी मार्केट जवळ, सिंहगड रोड असे सांगीतले.त्यानंतर पो.उपअधी.श्री लोखंडे यांनी गायकवाड यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंच क्र.2 च्या मदतीने ताब्यात घेतली. त्यावेळी पेट्रोलपंपच्या केबिनमध्ये गायकवाड यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पो.उपअधी.श्री लोखंडे व सापळा पथक यांना पुढील कामकाज करण्यासाठी मी आमच्या संस्थेच्या कार्यालयातील एक कक्ष पुढील कामकाज करण्यासाठी उपलब्ध करुन दिला.त्यानंतर सापळा पथक गायकवाड सह तेथे आले. त्यानंतर त्याठिकाणी पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दि. 29/01/2024 रोजी दुपारी 13/13 वा. ते 15/06 वा. च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या वेळी यातील लोकसेवक अशोक श्रीपती गायकवाड, वय-52 वर्ष , पद-निरीक्षक,वैध मापनशास्त्र विभाग श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर,जि.अहमदनगर, ह.मु.स्टेट बॅंकेजवळ,जीजामाता चैक, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर.जि. अहमदनगर, रा.फ्लॅट नं. 02, स्वामिनी रेसिडेन्सी, सनसिटी रोड, पीएमएसी भाजी मार्केट जवळ, सिंहगड रोड यांनी आमच्या संस्थेमार्फत चालविला जात असलेला प्रवरानगर येथील भारत पेट्रोलीयम कंपणीच्या पेट्रोल पंपाची तपासणी करुन त्याबाबतचे स्टॅम्पिंग प्रमाणपत्र देण्यासाठी माझ्याकडे 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/-रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन माझ्याकडुन पंचासमक्ष स्वीकारली

म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

kailas fakirba wagh(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
लोणी पोलीस स्टेशन,ता.राहाता

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): kailas fakirba wagh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):